शासन निर्णय क्रमांकः विसयो-२०१०/प्र.क्र.१७५/विसयो-२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० चे परिशिष्ट

## परिशिष्ट-३

## इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना
## पात्रतेचे निकष, अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | **वय-** ६५ व ६५ वर्षांवरील. |
| २ | **कुटुंबाचे उत्पन्न-** कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे . |
| ३ | **आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन -** रुपये २००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना + याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेखाली रुपये ४००/- प्रतिमहिना असे एकूण रुपये ६००/- प्रतिमाह प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळेल. |
| ४ | **पात्रतेची अर्हता-** दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असणे आवश्यक आहे. |
| ५ | **वयाचा दाखला-** ग्रामपंचायतीच्या / नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उता-याची सांक्षांकित प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा किंवा ग्रामीण / नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा तत्सम दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिका-याने दिलेला वयाचा दाखला. |
| ६ | **उत्पन्नाचा दाखला-** दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा. |
| ७ | **रहिवाशी दाखला-** ग्रामसेवक / तलाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राह्य धरण्यात येईल. |
| ८ | शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही. |
| ९ | संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षाचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. |
| १० | एखाद्या विशिष्ट प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या व विहित अटी पूर्ण करीत असलेल्या अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याचे अधिकार शासनालासुध्दा राहतील. |

एच-२५९२[५०००-१०-२०१०]-११